महाराष्ट्र जनशक्ती

**ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५५ वा | दिनांक : ०९/१२/२०२५ | वार : मंगळवार

## भूषण गवई राज्यकर्त्यांचे पाप झाकून दलितांमध्ये संघर्ष माजवत आहेत ! - दलित नेते, विचारवंतांचा आरोप



**मुंबई** : राज्यकर्त्यांनी पुणे कराराचा केलेला भंग आणि अनुसूचित जातींचा केलेला घोर विश्वसघात हेच आरक्षणाच्या लाभाबाबत असमानता निर्माण होण्याचे खरे मूळ कारण आहे. पण ते दडवून ठेवून माजी सरन्यायाधीश भूषण गवई हे अनुसूचित जातींमध्ये स्पर्धा, चढाओढ सुरू असल्याचे सांगत गैरसमज, आकस आणि आपसातील संघर्षाची चूड पेटवत आहेत, असा स्पष्ट आरोप दलित नेते आणि विचारवंतांनी केला आहे.

या संदर्भातील एक पत्रक शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर, राष्ट्रीय चर्मकार संघाचे अध्यक्ष, माजी आमदार बाबुराव माने, प्रजासत्ताक जनता परिषदेचे अध्यक्ष प्रबुद्ध साठे, ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ, बुद्धिस्ट - शेड्युल्ड कास्टस मिशनचे संयोजक अच्युत भोईटे यांनी आज प्रसिध्द केले आहे.गवई हे सरकारच्या चुका आणि पापांवर पांघरूण घालण्यासाठी आरक्षणाचा लाभ मिळालेल्या काही जातींना आपलपोट्टे ठरवत आहेत. इतकेच नव्हे तर, त्यांच्या विरोधात लाभापासून वंचित राहिलेल्या जातींना उकसवत आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

पुणे कराराचा भंग;दलितांचा विश्वसघातपुणे करारात आरक्षणाच्या लाभासाठी अनुसूचित जातींना सक्षम करण्याची जबाबदारी केंद्र आणि राज्यांच्या सरकारवर सोपवणारे कलम महत्वाचे होते. त्यात दलितांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले होते. पण राज्यकर्त्यांनी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. हा पुणे कराराचा भंग आणि दलितांचा विश्वसघात आहे, असे दलित नेत्यांचे म्हणणे आहे.आरक्षणातून शिरकावासाठी फक्त संधी उपलब्ध होते. त्या संधीचा लाभ घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता अपरिहार्य असते .

पण शिक्षण मिळवणे कठीण, अशक्य झालेल्या परिस्थितीशी सामना करणाऱ्या अनुसूचितजातींना समान संधीचा लाभ मिळणार तरी कसा ? असा सवालही पत्रकातून त्यांनी विचारला आहे.अनुसूचित जातींवर घटनाबाह्य क्रीमी लेअर लादण्यासाठी आणि त्यांचे उपवर्गीकरणरुजवण्यासाठीची गवई यांची सारी वक्तव्ये, भाषणे ही प्रचारी थाटाची आहेत. तसेच त्यांचा आविर्भाव - आवेश हा ' कंत्राट ' घेतल्यासारखा आहे, असे पत्रकात म्हटले आहे.

आधी शिक्षणाच्या खासगीकरणावर बोला !' समान संधीसाठी सकारात्मक धोरण कृती ' साठी कार्यरत झालेल्या भूषण गवई यांनी एकूणच बहुजन समाजाला शिक्षण मुश्कील करून ' समान संधी ' च्या तत्त्वाला हरताळ फासणाऱ्या शिक्षणाच्या खासगीकरण वर आपली भूमिका आधी स्पष्ट करावी, असे आव्हान पत्रकाच्या शेवटी देण्यात आले आहे.

## वेगळ्या विदर्भाचा आमचा अजेंडा कायम : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**नागपूर** : विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी नागपुरात वेगळ्या विदर्भाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काँग्रेसने उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, वेगळ्या विदर्भावर आम्ही काम करत असून आमची त्याबाबतची भूमिका कायम आहे, असे महत्त्वपूर्ण वक्तव्य राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

या विषयावर पक्षाची भूमिका स्पष्ट करताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीपासूनच वेगळ्या विदर्भाच्या बाजूने भूमिका मांडली आहे. त्यामुळे या विषयावर आमचा अजेंडा आजही कायम आहे आणि आम्ही त्यावर काम करत आहोत. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या विदर्भाच्या प्रश्नावर उत्तर देताना बावनकुळे यांनी हे स्पष्टीकरण दिले.

नागपुरात आजपासून सुरू झालेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आधीच तापले आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच विरोधी पक्षांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकला होता. त्याचवेळी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकदा वेगळ्या विदर्भाची जोरदार मागणी करून सरकारला धारेवर धरले होते. वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या विदर्भाच्या मागणीकडे पुन्हा लक्ष वेधले गेल्याने अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची चिन्हे आहेत.

वेगळा विदर्भ झाल्याशिवाय विकास अशक्य- विजय वडेट्टीवार

वेगळ्या विदर्भासंदर्भात बोलताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, विदर्भाचा वर्षानुवर्षांचा विकासाचा अनुशेष भरून काढायचा असेल, तर 'वेगळा विदर्भ' हाच एकमेव पर्याय आहे. जोपर्यंत सत्तेत योग्य वाटा मिळत नाही, तोपर्यंत विदर्भाला न्याय मिळणे कठीण आहे, अशी रोखठोक भूमिका वडेट्टीवारांनी मांडली आहे.

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून विदर्भातील जनता आणि विविध संघटना वेगळ्या विदर्भाची मागणी करत आहेत. मात्र, अनेकदा या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला जातो. आता खुद्द महसूलमंत्र्यांनीच 'आम्ही काम करत आहोत' असे सांगितल्याने विदर्भवाद्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर विरोधक यावर काय भूमिका घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## विरोधी पक्षनेता नसणे ही लोकशाहीची थट्टा : सत्ताधाऱ्यांना लाज वाटली पाहिजे, हर्षवर्धन सपकाळ



**नागपूर** : सत्ताधाऱ्यांना शर्म वाटली पाहिजे की ते अधिवेशन समोर रेटत आहेत. अधिवेशन कमी काळाचे आहे आणि विरोधी पक्षनेता नसणे हे लोकशाहीची थट्टा असल्याची टीका कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. १० टक्के निकष हा कुठलाही संकेत नाही किंवा संवैधानिक स्वरूपात त्याचा उल्लेख नाही. वरच्या सभागृहात कॉंग्रेसचे १० टक्के सदस्य आहेत. त्या अनुषंगाने आम्ही आमचा प्रस्ताव सादर केलेला आहे, असेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, लोकशाहीची पायमल्ली न करता संविधानाचे पुरोगामित्व जोपासले जावे अशी अपेक्षा आहे. विरोधक आवश्यक आहेत. तुकाराम महाजांचा जो महाराष्ट्र धर्म आहे तो सरकारने जोपासावा. अर्धा वेळ सत्ताधारी आणि अर्धा वेळ विरोधकांनी चर्चा करावी तेवढा वेळ त्यांना द्यावा. दोन्ही सभागृहातील विरोधी पक्षनेत्याचा जो प्रश्न आहे तो निकाली काढावा. तसेच जर असे ते करत नसतील तर त्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही असा अर्थ असल्याचे सपकाळ यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री पदावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, उपमुख्यमंत्री पद हे निश्चितच असंवैधनिक आहे. जे संवैधानिक आहे विरोधी पक्षनेते पद ते आपण देत नाही. या संविधानाला सभ्यतेला आणि महाराष्ट्र धर्माला दाखवलेल्या वाकोळ्या आहेत. खालच्या सभागृहात शिवसेनेचे जास्त सदस्य आहेत. शिवसेनेने मागील विधानसभेत त्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रस्ताव नसेल तर पुन्हा पाठवता येईल, खोळंबा करण्याची आवश्यकता नाही.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी शेतकऱ्यांसाठीच्या स्वामिनाथन आयोगावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, स्वामिनाथन आयोग विदर्भातील शेतकऱ्यांच्या जखमांवर फुंकर घालणारा होता. नुसत्या घोषणांचा पाऊस न पाडता, शेतकऱ्यांना थेट दिलासा देणे, हे निर्णय शासनाने घेतले पाहिजे अशी अपेक्षा या अधिवेशनात असल्याचे सपकाळ म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ डिसेंबर २०२५


## सरदार एस. के. पवार माध्यमिक विद्यालय नगरदेवळा ता. पाचोरा जि.जळगांव येथे महापरिनिर्वाण दिवस साजरा



**पाचोरा (प्रतिनिधी) :** उंच मानेने जगायचे असेल तर शिक्षण हा एकमेव पर्याय. सादीक शेख सरसरदार एस. के. पवार माध्यमिक विद्यालय नगरदेवळा ता. पाचोरा जि.जळगांव येथे महापरिनिर्वाण दिवस साजरादिनांक ६ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी सरदार एस. के पवार विद्यालयात महापरिनिर्वाण दिवस साजरा करण्यात आला. महापरिनिर्वाण दिनानिमित्त विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक सादीक शेख सर यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या जीवनात अंमलात आणावे कारण शिक्षण हेच जीवन समृद्ध करण्याचे आणि उंच मानेने जगण्याचे एकमेव पर्याय आहे असे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

विद्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेतील पर्यवेक्षिका श्रीमती मनिषा जाधव मॅडम यांनी भूषविला तर शाळेतील उपक्रमशील शिक्षक स्काऊट गाईड विभाग प्रमुख जी. यू. पवार सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते सरांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.मुख्य वक्ता म्हणून सादीक शेख सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच पी. आर. तायडे सर इकबाल शेख सर यांनी कविता व गीत सादरीकरण केले. शाळेतील मराठी आणि उर्दू विभागातील विद्यार्थ्यांनी आपापले भाषण उत्कृष्ट पद्धतीने केले तसेच तायडे सर लिखित व अमोल सर संगीत बद्ध केलेले गीत यावेळी सादर करण्यात आले.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंदांनी व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांनी मेहनत घेतली. समाधान ठाकूर सरांनी सूत्र संचालन उत्कृष्टपणे केले तर आभार प्रदर्शन राकेश सोनवणे सरांनी व्यक्त केला.सैय्यद जाकीर अली सरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या शेवटी भाषणात आणि गीतांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.






## ‘राजहंस प्रकाशना’ तर्फे ‘जीवदान’ कादंबरी प्रकाशित




माझी ‘जीवदान’ नावाची कादंबरी पुण्याच्या ‘राजहंस प्रकाशना’तर्फे आताच प्रकाशित झाली आहे. भावनिक आंदोलने आणि मनोव्यापार यांची धक्कादायक कथा साकारणारी शोकांतिका म्हणजे ‘जीवदान’ ही कादंबरी. मिथकांत बहुतांशपणे अहिराणी बोली, अहिराणी परिवेश आणि अहिराणी लोकजीवन उपयोजित झाले असून ग्रामीण साहित्यातील वेगळ्याच कलात्मक मापदंडासह कादंबरी लिखाणाचा हा प्रयोग वाचकांना नक्कीच भावेल अशी अपेक्षा आहे. कादंबरीला शशिकांत सावंत यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. ‘जीवदान’ कादंबरी आणि ‘राजहंस’ प्रकाशन अनुभव’ नावाचा सविस्तर लेख येत्या 1 डिसेंबरच्या ब्लॉग मध्ये लिहीत आहे. या लेखात कादंबरीविषयी (महत्वाच्या अभ्यासू अभिप्रायांसह) अजून बरेच काही आणि प्रकाशकाचा लेखकाला आलेला सुखद अनुभव आपल्याला वाचायला मिळेल. म्हणून तूर्त इतकेच.

**- डॉ. सुधीर रा. देवरे**


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 'संत जगनाडे महाराज' यांची जयंती साजरी..




**शिरूर कासार :** दि.8 डिसेंबर 2025 सोमवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे 'संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराज' यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे यांच्या हस्ते,श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विज्ञान विभाग प्रमुख प्रा.संजय काकडे,प्रा.महारूद्र डोंगरे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे,प्रा.नारायण घोलप,प्रा.अशोक इनकर,प्रा.प्रशांत मळेकर,प्रा.संजय आव्हाड,प्रा.अनिल जरे,प्रा.दत्ता शिंदे,प्रा.बिभिषण घायाळ,प्रा.महादेव हांगे, प्रा. विश्वास ढाकणे,प्रा.नारायण तांबे,प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ.सत्यनारायण ढवळे,प्रा.सुनिल मोरे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा.घनश्याम चव्हाण,प्रा. शशिकांत जावळे,डॉ.अशोक घोडके,प्रा.अशोक सवासे,प्रा.विनोद गलांडे,प्रा.हनुमंत घायाळ,प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.अमर खोले,प्रा.सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सिमा ढवळे,सौ.अनिता लाटे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,जयेंद्र निकम,राजू बडे,आप्पासाहेब कांबळे,प्रकाश राऊत,नितीन बहिर,रोहित शिराळे,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,गौतम भोसले आणि विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी,संत जगनाडे महाराज' यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ डिसेंबर २०२५

## विद्यार्थी, शेतकरी, कामगारांना दररोज गुढघ्या बरोबर पाण्यातून करावा लागतो जीवघेणा प्रवास



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड):** मीटमीटा तिसगाव रस्त्यावर गेट न ४९ LC रेल्वेचे अंडर पास रस्ता तयार करण्यात आला आहे पण या ठिकाणी पाणी निघण्यासाठी व्यवस्थित व्यवस्था करण्यात आली नाहीपाणी निघायचे पाइपलाइन वर झाली असून रस्ता खाली झाले असल्याने येथे सतत पाणी भरलेले असते याच पाण्यातून दररोज शालेय विद्यार्थी,ग्रामस्थ परिसरातील शेतकरी व कंपनी कामगार यांना नाहक त्रास सहन करावा लागतो याठिकाणी दररोज मुले जात असताना खाली पडतात तर वयस्कर दोन महिला पडून जखमी झाली आहे तर अनेक दुचाकी स्वार येथे पडून जखमी झाले आहेया रस्त्याबद्दल दक्षिण मध्य रेल्वे वरिष्ठ अनुभाग याना अनेक वेळा पाणी काढून देण्यासाठी ग्रामस्थांनी निवेदन दिली आहेपरंतु आतापर्यंत कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना संबधित रेल्वे विभागाच्या वतीने करण्यात आली नाही या त्रासाला कंटाळून या दि ०८ सोमवारी सकाळी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी,शेतकरी ,ग्रामस्थ जमा झाले होते यावेळी भाजपचे माजी मंडळ अध्यक्ष दीपक बनकर यांनी घटनास्थळी धाव घेत विद्यार्थी, शेतकरी यांची व्यथा जाणून घेतली व रेल्वे चे नांदेड चे रेल्वे प्रबधक (डी एम) ला फोन करून सर्व माहिती दिली रेल्वे प्रबधक यांनी यावर तोडगा काढण्यासाठी लवकरात लवकर उपाय करण्याचे आश्वासन दिले आहे शेतकरी व पालक वर्ग यांनी या ठिकाणचे पाणी लवकरात लवकर काढून दयावे नसता लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहेयावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण बनकर,दिलीप जाधव,बबनराव मुळे, दशरथ मुळे, गंगा चव्हाण,अमोल मुळे,लक्ष्मण सातपुते,बाळू सुराशे,सचिन सुराशे,नारायण दुबिले,कासाबाई दुबिले,ठाकूबाई दुबिले,पार्वताबाई दुबिले,सचिन मुळे,रतन दुबिले, राम पेहरकर,शुभम मनगटे ,रामनाथ जाधव ,पंकज सातपुते,शिवराम राजळे,दादाराव मुळे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते




## उपविभागीय अधिकारी आणि तलाठींवर गैरव्यवहाराचे आरोप; जमीन नोंदणी रद्द करण्याची मागणी



**अकोला (प्रतिनिधी) :** मौजे जलालाबाद ता.जी अकोला येथील गट क्रमांक ५३ क्षेत्र एक हेक्टर ३२ आर. ही देवमन पुंडलिक ढवळे यांच्या मालकीची असून सदर जमीन वर्ग दोन मधील आहे. देवमन पुंडलिक ढवळे यांना पैशांची गरज असल्याने त्यांनी देविदास गावंडे यांच्याकडून सन १९९६ मध्ये रक्कम १५०००/ व्याजाने घेतले होते. त्याकरिता नाममात्र खरेदी म्हणून मौजे जलालाबाद येथील गट क्रमांक ५३ मधील ०.हे ५१आर या क्षेत्राचे खरेदीखत रत्नाबाई देविदास गावंडे यांच्या नावे दिनांक २९.२. १९९६ रोजी नोंदवून दिले होते. सदर खरेदीखत हे वर्ग २ चे व तुकडे बंदी कायद्यांतर्गत येत असल्यामुळे त्याची नोंदणी न करण्याचे ठरले होते तसेच ताबा देवमन पुंडलिक ढवळे यांचाच राहील असे ठरले होते. रक्कम परत केल्यानंतर खरेदी खाते सुरतीपासून गैर कायदेशीर असल्यामुळे तुकडे बंदी कायद्यात असल्यामुळे रद्द करण्याची आवश्यकता नव्हती.सण २०१३ मध्ये रत्नाबाई व त्यांचे पती देविदास गावंडे यांनी खरेदी खताचा दुरुपयोग करण्याची धमकी पुंडलिक ढवळे यांना दिली. म्हणून त्यांनी न्यायालयात दावा दाखल केला असता वरील संदर्भावरून दिवाणी न्यायालयाने देवमन पुंडलिक ढवळे यांच्या बाजूनेच न्यायालयीन निकाल दिला आणि रत्नाबाई देविदास गावंडे, आणि देविदास गावंडे यांनी अडथळा करू नये असा कायमचा हुकूम अकोला येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांनी दिला आहे. याबाबत रत्नाबाई गावंडे तसेच तलाठी देशमुख मौजे जलालाबाद व उपविभागीय अधिकारी यांना माहिती आहे. असे असताना सुद्धा देवमन पुंडलिक ढवळे हे अनुसूचित जातीचे असल्यामुळे तलाठी श्री देशमुख आणि उपविभागीय अधिकारी श्री शरद जावळे तसेच रत्नाबाई गावंडे यांनी संगणमत करून देवमन पुंडलिक ढवळे यांना नुकसान पोहोचावे याकरिता गैर कायदेशीररित्या कायद्यात कोणतीही तरतूद नसताना तुकडेबंदीचा भंग करणारे खरेदीखत आणि न्यायालयीन आदेश असताना सुद्धा व देवमन पुंडलिक ढवळे यांना नोटीस दिल्यास ते न्यायालयाचा आदेश व ताब्याबाबत आक्षेप दाखल करतील व त्यांना संधी मिळू नये याकरिता वरिष्ठ जातीचे उपविभागीय अधिकारी यांनी कोणतीही नोटीस देवमन ढवळे यांना दिली नाही. कोणताही न्याय निवाडा करत असताना विरुद्ध पार्टीला नोटीस देणे हे नैसर्गिक न्यायाचे तत्व आहे आणि ते कायदेशीर आहे विरुद्ध पार्टीला ऐकल्याशिवाय तुम्ही कोणताही न्याय देऊ शकत नाही. असे काय घडले की उपविभागीय अधिकारी यांना देवमन ढवळे यांना नोटीस काढावी वाटली नाही. जर दिवाणी न्यायालयाने देवमन ढवळे हेच मालक असल्याचा न्याय निवाडा दिला असेल तर न्यायालयापेक्षा उपविभागीय अधिकारी मोठे होऊ शकतात का.? अशा कोणत्या कायद्याचा वापर करू न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करून उपविभागीय अधिकारी यांनी हा फेरफार केला.

तसेच तलाठी देशमुख यांच्याकडे कोणतेही रत्नाबाई यांच्या ताब्याबाबतचे दस्त नसताना सुद्धा त्यांनी ताब्याचा दस्त खोटा तयार केला. त्यामुळे उपविभाग अधिकारी व तलाठी आणि रत्नप्रभात गावंडे यांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा केलेला आहे. खोटे दस्त बनविणे तसेच त्याला नुकसान पोहोचवणे त्यांना नोटीस न देणे त्यांचे म्हणणे न ऐकणे कोणताही ताबा बाबत दस्त नसताना सुद्धा उपविभागीय अधिकारी श्री जावळे साहेब यांनी पदाचा दुरुपयोग करून गैर कायदेशीर रित्या देवमन पुंडलिक ढवळे यांच्या मालकीची जमीन रत्नाबाई गावंडे यांच्या नावावर केलेली आहे. उपविभागीय अधिकारी तसेच तलाठी आणि रत्नाबाई गावंडे यांची तक्रार देवमान ढवळे यांनी २/९/२०२५ रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाणे अकोला येथे केली असता सुद्धा पोलीस अधिकारी श्री बाळू पवार यांनी कोणत्याही प्रकारे दखल न घेतली नाही. हीच तक्रार अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक साहेब यांना सुद्धा पाठवले आहे. तरीसुद्धा संबंधित व्यक्तीवर गुन्हे दाखल झाले नाहीत करिता बौद्ध समाजाचे वयोवृद्ध शेतकरी देवमन पुंडलिक ढवळे हे दिनांक ८-१२-२०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय अकोला समोर न्याय मागण्या करता उपोषणाला बसले आहेत. संबंधित खोटे दस्तऐवज बनवणाऱ्या अधिकाऱ्यावर ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल व्हावे यासाठी त्यांनी उपोषण चालू केले. संबंधित उपोषणाची अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक साहेब आणि महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री साहेब तथा महसुल मंत्री साहेब यांनी दाखल घेऊन. संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करावे तसेच गैर कायदेशीर दृष्ट्या केलेला फेरफार रद्द करावा. आणि गरीब कुटुंबातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा

## "अंगत पंगत" ला बालसाहित्य पुरस्कार प्रदान




**छत्रपती संभाजीनगर :-** (प्रतिनिधी) आहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील दोस्ती फाऊंडेशनच्या वतीने नुकतेच कलावंत पैगंबरवाशी मजनुभाई यांच्या स्मृतिदिना निमित्ताने साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन दोस्ती फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रसिद्ध कवी रज्जाकभाई यांनी आयोजित केले होते.

या पुरस्कार सोहळ्यात मराठवाडयाचे प्रसिध्द बालकवी अय्युब पठाण लोहगावकर लिखीत "अंगत पंगत" या बालकवितासंग्रहाला " मजनुभाई बालसाहित्य पुरस्कार " संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री डॉ. एस. एन. पठाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या पुस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्हे, आणि सन्मानपत्र असे आहे. याप्रसंगी प्रसिध्द गीतकार श्री. बाबासाहेब सौदागर, वैजापुरचे प्रसिध्द बालकवी धोंडीरामसिह राजपूत,कन्नडचे साहित्यिक लक्ष्मण वाल्डे, ज्ञानेश्वर गायके व श्रीरामपूर येथील नागरीक यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता सहभोजनाने झाली.

## शिवाजी महाविद्यालयात संत जगनाडे महाराज



**कन्नड (प्रतिनिधी) :** संत तुकाराम महाराजांच्या गाथेचे लेखणीक संत जगनाडे महाराज यांची जयंती येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र अंतर्गत संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्रातर्फे साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. बी.के. मगर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. रामचंद्र झाडे यांनी संत जगनाडे महाराज यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मराठी विभाग व संत तुकाराम अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले .

## अज्ञानाकडून ज्ञानाकडे

शिक्षणाची गंगा
आली आपल्या दारी
चला सर्व शाळेला
राहू नका घरी

अज्ञानाच्या अंधारात
पेटवूया ज्ञानाच्या ज्योती
रोज शाळेला जाऊनी
पाटी पेन्सिल घ्या हाती

सांगून गेले गाडगेबाबा
ज्ञान म्हणजे तिसरा डोळा
धन अक्षराचे मोठे
राहू नये कुणी खुळा

ज्ञानाची कास धरता
प्रगतीचे उघडतिल दारे
देश साक्षर करण्यासाठी
आपण झटुया सारे

साक्षरतेची मशाल घेवूनि
उज्वल भारत घडवूया
अज्ञानातून ज्ञानाकडे
एकजुटीने जाऊया




**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## डॉ. मधुकरराव वासनिक महाविद्यालयात भीम स्वरांजली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यान माला संपन्न







**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक विचारपीठ असून त्यांनी निर्मिलेल्या संविधानामुळेच समता आणि धार्मिक सदभावना अर्थपूर्ण आहे. डॉ. आंबेडकर यांनी या देशातील अगदी शेवटच्या श्रेणीतला व्यक्ती आणि त्याचे माणूस म्हणून जगण्याचे अधिकार तसेच सर्व भारतीयांचे आयुष्य सुरक्षित राहावे म्हणून आपले जीवन वेचले. आपला देह झिजवीला. त्यासाठी त्यांनी आपल्या कुटुंबाची, मुला बाळाची, आपल्या राजकीय भवितव्याची आणि प्रसंगी प्राणाचीही पर्वा केली नाही. मानव ते महामानव हा बाबासाहेबांचा त्यागमय प्रवास आणि बलिदान नव्या पिढीने समजून घेतले पाहिजे." असे मार्मिक विचार नागपूर खंडपीठ उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधिज्ञ आणि विश्लेषक डॉ. फिरदोस मिर्झा यांनी व्यक्त केले. ते डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे महापरिनिर्वाण दिनी आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यान मालेचे प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते.

यावर पुढे बोलताना " डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाद्वारे सर्वांना समान संधी आणि स्वतंत्र जीवन जगण्याचा समान अधिकार दिला आहे. सर्वांना धार्मिक सदभावनेचा अधिकार दिलेला आहे. आपल्या धर्माचे पालन करताना इतर धर्मियांच्या श्रद्धेला तडे जाऊ नये. याचे भान प्रत्येक भारतीयाने ठेवायला हवे. कारण सदभावना संपली तर समानता संपेल. समानता संपली तर बंधुतेचा लोप होईल आणि बंधुता संपली तर सामाजिक न्याय उध्वस्त होईल." असे चिंतनपर विचार डॉ. मिर्झा यांनी याप्रसंगी मांडले. या ऐतिहासिक वैचारिक आणि चिंतन शील परंपरेचा पाईक होण्याची मला निमंत्रित करून संस्थेने संधी दिली. याप्रती गौरवोदगार आणि संस्थेप्रती कृतज्ञता भाव याप्रसंगी डॉ. मिर्झा यांनी व्यक्त केला.

महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर गेल्या अठ्ठावन्न वर्षांपासून अविरत पणे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी या ऐतिहासिक व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे या व्याख्यान मालेला एक समृद्ध असा वैचारिक आणि सामाजिक वारसा आहे. बाबासाहेब यांचे कार्य, कर्तृत्व आणि विचारधन समाजातील सर्व स्तरात पोहोचविणे यात या स्मृती व्याख्यान मालेची शीर्षस्थ आणि अग्रणीय भूमिका राहिलेली आहे. या आयोजनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अष्टपैलू आणि उत्तुंग जीवन कार्याला स्पर्श करणाऱ्या विविध विषयांवर विचामंथन करण्यासाठी गणमान्य वक्त्यांना दरवर्षी पाचारण करण्यात येते. या वर्षी प्रमुख वक्ता म्हणून उच्च न्यायालय नागपूर खंड पिठाचे जेष्ठ कायदेतज्ज्ञ आणि आंबेडकरी चळवळीचे ख्यातकीर्त भाष्यकार डॉ. फिरदोस मिर्झा यांना निमंत्रित करण्यात आले होते. या स्मृती व्याख्यान मालेचे अध्यक्षपद पीपल्स वेलफेअर सोसायटी चे सचिव, श्री. मनोज एम. वासनिक यांनी भूषविले. या प्रसंगी ओ. बी. सी. वकील महासंघाच्या समन्वयक ऍड. समीक्षा गणेशे या विशेष अतिथी म्हणून विचार पीठावर उपस्थित होत्या. महाविद्यालया च्या कार्यकारी प्राचार्य डॉ. प्रज्ञा बागडे, सांस्कृतिक समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. गामिनी मेश्राम, एम. सी. व्ही. सी. विभाग प्रमुख प्रा. रेखा बावनकुळे यांचीही प्रामुख्याने उपस्थिती होती. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाष्या तुन संस्थेचे सचिव श्री मनोज वासनिक यांनी देखील बोधिसत्वास अभिवादन केले. आणि हा वैचारिक वारसा अविरत असाच महाविद्यालयाने सुरु ठेवावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

व्याख्यान मालेची प्रदीर्घ वैचारिक परंपरा आणि आयोजनाची प्रास्ताविक भूमिका महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी विषद केली. व्याख्यानमालेच्या सुरुवातीला प्रा. प्रज्ञा कोचे यांनी अर्पणगीताच्या माध्यमातून महामानवास आदरांजली वाहिली. अतिथी वक्त्यांचा परिचय सभागृहास डॉ. सुदेश भोवते यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमेध नागदेवे यांनी केले. तर मान्यवरांचे आणि उपस्थितांचे आभार उप प्राचार्य प्रा. गामिनी मेश्राम यांनी मानले.

०५ डिसेंबर ला भीम स्वरांजली चे आयोजन करण्यात आले. भीम स्वरांजली साठी प्रमुख अतिथी म्हणून मध्य प्रदेश लोकसेवा आयोगाचे समन्वयक श्री. सतीश पुणेकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा बागडे होत्या. या प्रसंगी वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उत्तुंग जीवन कार्यातील रण संग्राम, त्याग व बलिदान आणि त्यांच्या प्रती कृतज्ञ भाव व्यक्त करणारी एका पेक्षा एक सुमधुर भीम गीते सादर केली. प्रा. सुनील कोचे, डॉ. महेंद्र गायकवाड, डॉ. सुमेध नागदेवे, डॉ. सुदेश भोवते, डॉ. सुशांत चिमणकर, प्रा. प्रज्ञा कोचे, प्रा. राहुल वासनिक यांनी वंदनगीतातुन प्रज्ञा सूर्यास आदरांजली वाहिली. महाविद्यालयातील पदवी आणि पदव्यूत्तर विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी भीम स्वरांजलीत उस्फूर्त सहभाग नोंदवला आणि क्रांती सूर्यास अभिवादन केले. या भीम स्वरांजलीचे सुमधुर सूत्रसंचालन आणि निवेदन डॉ. कमलाकर तागडे आणि प्रा. मनिषा नागदेव यांनी केले.

उपरोक्त कार्यक्रमांच्या यशस्वीते करिता डॉ. चंद्रशेखर पाटील, डॉ. महेंद्र गायकवाड, डॉ. मनीषा नागपुरे, डॉ. कमलाकर तागडे, डॉ. सुशांत चिमणकर, डॉ. सुदेश भोवते, डॉ. सुमेध नागदेवे, डॉ. विमल राठोड, डॉ. विवेक चव्हाण, डॉ. मेघा रामटेके, डॉ. अमृता डोर्लीकर, ग्रंथपाल श्री. सिद्धार्थ वाणी आणि प्रा. सना कौसर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला हिंदी साहित्याचे गाढे अभ्यासक आणि माजी विभाग प्रमुख डॉ. मिथिलेश अवस्थि, श्री. नरेश गजभिये, श्री. सतीश पाली यांनी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमाकरिता परिसरातील निमंत्रित प्रतिष्ठित नागरिक, आंबेडकरी विचारवंत आणि वरिष्ठ, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या परंपरेनुसार कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने संपन्न झाली.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ डिसेंबर २०२५

# भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील सामाजिक वास्तव

देशभरातील प्रशासन, सार्वजनिक सेवा, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायव्यवस्था आणि नागरिक, समाज यांचे पारस्परिक नाते जेव्हा भ्रष्टाचाराच्या वाढत्या प्रकरणांमुळे प्रभावित होते, तेव्हा त्याचा परिणाम केवळ आर्थिक किंवा कायदेशीर मर्यादेत मर्यादित राहत नाही, तर सामाजिक संरचना, विश्वास, पारदर्शकता आणि न्याय या मूल्यांवर खोलवर दिसून येतो. २०२३ मधील National Crime Records Bureau (NCRB) च्या अहवालानुसार, भारतात राज्यातील भ्रष्टाचारविरोधी यंत्रणांकडून नोंदवलेली प्रकरणे ४,०६९ होती, ज्यात सुमारे ७१ टक्के प्रकरणे “ट्रॅप” प्रकारात होती, म्हणजे लाच देताना किंवा घेताना आरोपी रंगेहात पकडले गेले. या आकड्यांमागील वास्तव असे आहे की, भ्रष्टाचार फक्त काही प्रकरणांपुरता मर्यादित नाही; तर मोठा भाग अजूनही समाजात लपलेला आहे. “ट्रॅप” प्रकारात पकडलेली प्रकरणे हे फक्त टोकाचे उदाहरण आहेत. हजारो प्रकरणे, जिथे भ्रष्टाचार घडतो पण नोंद होत नाही, अशा व्यवहारांचा समावेश या आकड्यांमध्ये नाही. प्रत्यक्ष संबंध नसलेले व्यक्ती, अनधिकृत शुल्क, अधिकारांवर दबाव, सेवा-परवाना प्रक्रियेत अनियमितता हे भ्रष्टाचाराचे वास्तविक रूप आहे, जे पकडले जात नाही, पण समाजावर खोल परिणाम करते.पारंपरिक भ्रष्टाचारापेक्षा आजच्या काळात भ्रष्टाचाराचे स्वरूप बदलले आहे. आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, डिजीटल फसवणूक, व्यावसायिक व्यवहारातील भ्रष्टाचार हे गंभीर प्रमाणात वाढले आहेत. २०२३ मध्ये आर्थिक गुन्ह्यांची नोंद २०२२ च्या तुलनेत ६ टक्क्यांनी वाढली, तर सायबर गुन्ह्यांमध्ये ३१.२ टक्क्यांची वाढ झाली असून, एकूण ८६,४२० प्रकरणे नोंदली गेली. या सायबर प्रकरणांपैकी अंदाजे ६९ टक्के प्रकरणे फसवणूक हेतूची होती. हे दर्शवते की डिजिटल व्यवहार, आर्थिक व्यवहार, ऑनलाईन सेवांचा दुरुपयोग हे भ्रष्टाचाराचे नवे रूप घेत आहेत.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, जेव्हा सार्वजनिक यंत्रणा पारदर्शक नसतात, उत्तरदायित्व राखत नाहीत आणि नागरिकांचा विश्वास घटतो, तेव्हा लोक वैध प्रक्रियांच्या ऐवजी अवैध मार्गांकडे वळतात. लाच, घोटाळा, प्रत्यक्ष संबंध नसलेले व्यक्ती व्यवहार. हे फक्त व्यक्तिगत नैतिकतेचा प्रश्न नाही; ही संस्थात्मक आणि सामाजिक समस्या बनते. अशा परिस्थितीत, गरीब, अल्पसंख्याक, मागासलेले वर्ग हे सर्वात जास्त प्रभावित होतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण किंवा शहरी गरीब लोकांना सरकारी सेवा, परवाने, योजना मिळवण्यासाठी आवश्यक माहिती, संपर्क, संसाधने नसतात. त्यामुळे त्यांना अवैध मार्गाचा अवलंब करावा लागतो. परिणामी, सामाजिक विषमता वाढते, न्याय कमी होतो आणि समान संधींचा अभाव निर्माण होतो. भ्रष्टाचारामुळे हे सामाजिक असमानता आणि विषमता आणखी खोलवर रुजते.शहरी व ग्रामीण परिस्थितींचा आढावा घेतल्यास, ग्रामीण भागात भ्रष्टाचाराचे स्वरूप मुख्यतः सरकारी योजनांमध्ये घोटाळा, पंचायत स्तरावरील गैरव्यवहार, जमीन व्यवहारातील अनियमितता, परवाने मिळवण्यात रस्सीखेच इत्यादी प्रकारात दिसते. शहरी भागात भ्रष्टाचार आर्थिक व्यवहार, व्यावसायिक व्यवहार, परवाने, सार्वजनिक सेवा, ऑनलाईन व्यवहार यामध्ये अधिक प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील लोकांना माहिती व साक्षरतेचा अभाव असल्यामुळे ते अधिक प्रभावित होतात, तर शहरी भागातील लोक अधिक जागरूक असले तरी आर्थिक गती व व्यावसायिक दबावामुळे भ्रष्टाचार अधिक तंत्रसंपन्न स्वरूपात दिसतो.आर्थिक गुन्हे आणि सायबर गुन्ह्यांमुळे फक्त व्यक्ती प्रभावित होत नाहीत, तर संस्था, उद्योग, समाज, आर्थिक व्यवहार, रोजगार, सार्वजनिक विश्वास हे सर्व प्रभावित होतात. डिजिटल व्यवहारातील फसवणूक, डेटा चोरी, ओळख चोरी, ऑनलाईन आर्थिक फ्रॉड हे नागरिकांचे रोजचे जीवन धोक्यात टाकतात. यामुळे सामाजिक विश्वास, आर्थिक स्थैर्य, पारिवारिक व सामुदायिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम होतो.भ्रष्टाचाराचा एक महत्त्वाचा सामाजिक परिणाम म्हणजे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवर असलेला विश्वास घटणे. जेव्हा लोक अनुभवतात की सरकारी योजना, परवाने, सेवांमध्ये पारदर्शकता नाही, तर ते न्याय मिळवण्यासाठी किंवा आवश्यक सेवा घेण्यासाठी भ्रष्ट मार्ग स्वीकारतात. परिणामी, समाजातील नैतिक मूल्ये कमजोर होतात, पारदर्शकता आणि जवाबदारी यांचा अभाव निर्माण होतो, आणि सामाजिक ढांचा ढासळतो.शिक्षण आणि जागरूकता यांचा अभाव देखील भ्रष्टाचार वाढवण्यास हातभार लावतो. शिक्षणात कमी, सामाजिक साक्षरतेत कमतरता, नागरिक अधिकारांची माहिती नसणे हे घटक लोकांना भ्रष्टाचाराच्या जाळ्यात सहज ओढून नेतात. जागरूक नागरिक फक्त स्वत:साठीच नव्हे, तर सामाजिक बदलासाठीही महत्त्वपूर्ण आहेत.संस्थात्मक दोष देखील भ्रष्टाचार वाढवतात. प्रशासकीय यंत्रणा, न्यायव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये पारदर्शक प्रक्रिया आणि जवाबदारी सुनिश्चित न केल्यास, भ्रष्टाचाराची पद्धत कायम राहते. दोषी पकडणे आणि दंड देणे आवश्यक आहे, पण पुरेसे नाही. सुधारणा ही प्रणालीत बदल, जवाबदारी वाढवणे, सार्वजनिक सहभाग सुनिश्चित करणे आणि सामाजिक मूल्यांची प्रतिष्ठा करण्यामध्ये आहे.डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. ऑनलाईन फसवणूक, आर्थिक फसवणूक, डेटा चोरी, ओळख चोरी, आर्थिक फ्रॉड हे सर्व नागरिकांसाठी गंभीर धोका आहेत. डिजिटल सुरक्षा, साक्षरता, तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि तत्पर न्यायव्यवस्था ह्या उपाययोजना करता येतील.जागतिक दृष्टिकोनातून पाहता, भ्रष्टाचार ही एक सार्वत्रिक समस्या आहे. आंतरराष्ट्रीय पारदर्शकता (Transparency International) च्या अहवालानुसार, भारताचा भ्रष्टाचार संदर्भातील जागतिक स्थान स्थिर आहे, परंतु विविध राज्यांमध्ये बदल मोठ्या प्रमाणावर आहेत. भ्रष्टाचाराविरोधी धोरणे, प्रशिक्षण, डिजिटल ट्रॅकिंग, पब्लिक फॉरम्स आणि नागरिकांचा सहभाग हे उपाय अनेक देशांमध्ये प्रभावी ठरत आहेत. भारतातही याची अंमलबजावणी आवश्यक आहे.सामाजिक स्तरावर, भ्रष्टाचारामुळे विषमता वाढते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग, अल्पसंख्याक, महिला, वंचित समुदाय हे सर्व भ्रष्टाचाराचे बळी ठरतात. सरकारी योजनांचा लाभ मिळविणे अवघड होते, सेवांमध्ये गती नसते, आणि त्यांचे जीवनमान घटते. परिणामी, समाजातील सामाजिक असमानता अधिक खोलवर रुजते. भ्रष्टाचाराचा प्रभाव आर्थिक विकासावरही पडतो. गुंतवणूक कमी होते, व्यवसायिक वातावरण अनिश्चित बनते, सेवा वितरण धीमे होते, आणि विकासाच्या योजनांचा परिणाम कमी होतो. परिणामी, देशाची आर्थिक स्थिरता वर्धित होत नाही, तर सामाजिक आर्थिक विषमता वाढते.भ्रष्टाचारावर मात करण्यासाठी उपाययोजना बहुआयामी असाव्यात. यात शिक्षण, जागरूकता, पारदर्शकता, जबाबदारी, डिजिटल सुरक्षा, आर्थिक न्याय, नागरिकांचा सहभाग आणि संस्थात्मक सुधारणा यांचा समावेश आवश्यक आहे. याशिवाय, सरकारी धोरणे प्रभावी करणे, ऑनलाईन सेवा सुधारित करणे, फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा मजबूत करणे, आणि दोषींवर त्वरित कारवाई करणे हे देखील महत्त्वाचे आहेत.९ डिसेंबर रोजी असणारा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो आपली सामाजिक जबाबदारी, सार्वजनिक मूल्ये, पारदर्शकता, न्याय आणि सुरक्षित समाज यांचा आढावा घेण्याचा दिवस आहे. जर आपण फक्त दोषी पकडण्यावर अवलंबून राहिलो, तर बदल होणार नाही. परंतु, जर नागरिक जागरूक राहिले, सामाजिक मूल्यांचे रक्षण केले आणि संस्थात्मक सुधारणा केली, तरच बदल शक्य आहे. भ्रष्टाचाराच्या वाढत्या आकड्यांमागील सामाजिक वास्तव फक्त आकडेवारी नाही; हे आपल्या समाजाची वास्तव स्थिती आहे. त्यावर विचार करून आणि बदलासाठी भूमिका घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समाजात पारदर्शकता, जवाबदारी, समान संधी, साक्षरता, डिजिटल साक्षरता, आर्थिक न्याय हे मूल्य रुजविणे आवश्यक आहे. जर नागरिक आणि संस्था यांनी एकत्र येऊन बदलासाठी काम केले, तर भ्रष्टाचार कमी होईल, सामाजिक न्याय साधला जाईल, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास सुसंगत होईल. बदल फक्त आकडेवारीत दिसला पाहिजे असे नाही, तर जीवनाच्या प्रत्येक स्तरावर अनुभवायला हवा.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. ९९६०१०३५८२, ईमेल -**
bagate.rajendra5@gmail.com